आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१४ ऑक्टोबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- मुंबईच्या पाचही प्रवेशद्वारांवर गर्दी टाळण्यासाठी लहान वाहनांना टोल माफ करण्याचा महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
- राष्ट्रीय जलपुरस्कारांची घोषणा, ओदिशाला प्रथम पुरस्कार तर महाराष्ट्राला विविध विभागात मिळून ५ पुरस्कार
- यंदाचा अर्थशास्त्रासाठीचा नोबेल पुरस्कार डेरॉन असेमोग्लु, सायमन जॉन्सन आणि जेम्स रॉबिन्सन या अमेरिकन शास्त्रज्ञांना जाहीर

  **आणि**

- प्रसिद्ध अभिनेते अतुल परचुरे यांचं निधन

**<><><><><>**

मुंबईतल्या ५ प्रवेश मार्गांवरचा हलक्या वाहनांसाठीचा टोल माफ करायचा निर्णय महाराष्ट्र राज्य सरकारनं घेतला आहे. शाळेच्या बस आणि एसटीच्या बसलाही तो लागू होईल. मुंबईतल्या प्रवेशद्वारांवर होणारी गर्दी कमी करण्यासाठी हा निर्णय घेतला असून तो कायमस्वरुपी राहणार असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.  राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत आज १९ निर्णय झाले. त्यात मराठवाड्यातल्या १० हजार हेक्टरहून अधिक क्षेत्राला, तसंच सिन्नर तालुका आणि जायकवाडी प्रकल्पासाठी लाभकारक नदीजोड प्रकल्पांना सुधारित मान्यता देण्यात आली.

बांधकाम कामगार मंडळाच्या कामगारांना प्रत्येकी ५ हजार रुपयांची मदत देण्याचा, दि. बा. पाटील यांच्या नावे आगरी समाजासाठी महामंडळ स्थापन करण्याचा, राज्यात प्रधानमंत्री शहरी आवास योजनेचा दुसरा टप्पा राबवण्याचा निर्णय आज घेण्यात आला.

मराठी भाषेविषयी जनजागृतीसाठी  पंधरवडा साजरा करण्याचा, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाला पद्मविभूषण रतन टाटा यांचं नाव देण्याचा, अडचणीतल्या सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ करण्याचा निर्णय आज मंत्रीमंडळाने घेतला. अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास मंडळ आणि उमेदसाठी अभ्यासगट स्थापन करायलाही राज्य सरकारनं मान्यता दिली. पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातल्या मार्गिकेच्या कामांनाही आज राज्य मंत्रीमंडळाची मंजुरी मिळाली.

**<><><><>**

राष्ट्रीय जल पुरस्कारांची घोषणा आज झाली. या पुरस्कारांमध्ये पहिला पुरस्कार ओडिसाला, द्वितीय पुरस्कार उत्तर प्रदेशला तर गुजरात आणि पुदुचेरी यांना तिसरा पुरस्कार विभागून देण्यात आला. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी नवी दिल्लीत या पुरस्कारांची घोषणा केली.

पुरस्कारांचं वितरण येत्या २२ तारखेला नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते केलं जाणार आहे. नऊ विभागांमधील संयुक्त विजेत्यांसह ३८ जणांना हे पुरस्कार दिले जातील. प्रत्येक पुरस्कार विजेत्याला प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह दिलं जाईल. तर काही विभागांतील विजेत्यांना याबरोबरच रोख रक्कम ही दिली जाईल. राष्ट्रीय जलपुरस्कारांमधे महाराष्ट्राला विविध विभागात मिळून ५ पुरस्कार जाहीर झाले आहेत.

**<><><><>**

इथेनॉल जैवइंधनाचे देशभरात ४०० पंप सुरु झाले असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीजने नवी दिल्ली इथं आयोजित जैव इंधन शिखर परिषदेत आज ते बोलत होते.  इथेनॉल आणि गॅस या दोन्ही इंधनावर चालू शकतील अशी

वाहनं लौकरच बाजारात आणण्याचा सरकारचा विचार असल्याचं त्यांनी सांगितलं. कचऱ्याचं व्यवस्थापन करुन त्याचा जैव इंधनासाठी वापर करणं गरजेचं आहे असं ते म्हणाले. जैवइंधन आर्थिकदृष्ट्याही किफायतशीर असल्याचं त्यांनी सांगितलं.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांचाही भाषण या कार्यक्रमात झालं. इंधन तेलात इथेनॉलचा वापर वाढवण्याचा भारतातला प्रयोग यशस्वी झाला असून पुढच्या वर्षी इथेनॉलचं प्रमण २० टक्के पर्यंत वाढवण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या मेक इन इंडिया या योजनेचा बोजवारा उडाला असून भीती आणि अनिश्चिततेच्या वातावरणामुळे खाजगी गुंतवणुकीच्या वाढीला खीळ बसली असल्याचं माजी केंद्रीय मंत्री आणि काँग्रेस कार्यकारणीच्या प्रसिद्धी माध्यम विभागाचे प्रमुख जयराम रमेश यांनी म्हटलं आहे. नरेंद्र मोदी यांच्या जवळच्या एक-दोन मोठ्या उद्योगसमूहांना पसंती मिळाल्यामुळे ही स्पर्धा थांबली असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज दिल्लीत काँग्रेसची बैठक झाली. राज्यातल्या विधानसभा निवडणुकीबद्दल या बैठकीत चर्चा झाली असून महाविकास आघाडी म्हणून निवडणूक लढवणार असल्याचं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी बैठकीनंतर बोलताना स्पष्ट केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत आज महाराष्ट्र भाजपाच्या कोअर समितीची बैठक झाली. या बैठकीला गृहमंत्री अमित शहा, जे पी नड्डा उपस्थित होते. विधानसभेच्या १५० ते १६० जागा

लढवण्यावर चर्चा झाली. तसंच राज्यातील मित्रपक्षांबरोबर जागा वाटपाबाबत काय तोडगा काढता येतील, यावरही चर्चा झाली.

**<><><><><>**

भगवान गौतम बुद्धांचा विचार तळागाळात पोहोचवून परिवर्तन करण्याची ताकद भिक्खु संघात आहे, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री किरेन रिजिजु यांनी केलं. मुंबईत समता परिषदेने भिक्खु संघासाठी आयोजित केलेल्या भोजनदान, चिवरदान कार्यक्रमात रिजिजु सहभागी झाले होते, त्यांनी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. गौतम बुद्ध, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुर्लक्षित झालेल्या स्थळांचा विकास केला जाईल, असं रिजिजु म्हणाले. या कार्यक्रमाला ऑल इंडिया भिक्खु संघाचे अध्यक्ष भदंत राहुल बोधी, भाजपचे संघटन मंत्री व्ही. सतीश, अशोक कांबळे उपस्थित होते.

**<><><><><>**

यंदाचा अर्थशास्त्रासाठीचा नोबेल पुरस्कार डेरॉन असेमोग्लु, सायमन जॉन्सन आणि जेम्स रॉबिन्सन या अमेरिकन शास्त्रज्ञांना जाहीर झाला आहे. आर्थिक विकासात, आर्थिक असमानता कमी करण्यात, आणि कायदा सुव्यवस्था सुधारण्यात समाजरचनेतल्या संस्थांची भूमिका यावर त्यांनी संशोधन केलं आहे. स्वेरिज रिक्सबँक नावाने यापूर्वी ओळखला जाणारा हा पुरस्कार ११ लाख अमेरिकन डॉलर्सचा आहे.

**<><><><><>**

प्रसिद्ध अभिनेता अतुल परचुरे यांचं आज मुंबईत निधन झालं. ते ५७ वर्षांचे होते. विनोदी अभिनेता म्हणून प्रसिद्ध झालेल्या अतुल परचुरेंनी बालरंगभूमीपासूनच अभिनयक्षेत्रात पदार्पण केलं. रंगभूमीबरोबरच छोट्या आणि मोठ्या पडद्यावरही त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. मराठी - हिंदी मिळून त्यांनी ४० पेक्षा जास्त चित्रपटात काम केलं. काही काळापूर्वी कर्करोगाशी सामना करुन ते त्यातून

यशस्वीपणे बाहेर पडले होते. तरुण तुर्क म्हातारे अर्क, वासूची सासू, प्रियतमा, या नाटकातल्या त्यांच्या भूमिका  विशेष गाजल्या. नवरा माझा नवसाचा, नारबाची वाडी, बुढ्ढा होगा तेरा बाप  हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट. परचुरे यांच्या निधनामुळं मराठी हिंदी चित्रपट आणि नाट्यसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परचुरे यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरमधली राष्ट्रपती राजवट उठवली असून, आता तिथे नवीन सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्र सरकारने यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. नॅशनल कॉन्फरन्सचे उपाध्यक्ष ओमर अब्दुल्ला यांनी नवीन सरकार स्थापनेचा दावा केला आहे.

<><><><><>

तमिळनाडूतल्या चार जिल्ह्यात १७ ऑक्टोबरपर्यंत अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने केलेल्या तयारीचा आढावा आज मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी घेतला.

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्यानं राज्यात अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज राज्याच्या हवामान विभागाने वर्तवला आहे. यामुळे दक्षिण आंध्रप्रदेश आणि उत्तर तामिळनाडूत दरड कोसळण्याचीही शक्यता आहे. मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत चेन्नई, कांचीपुरम, तिरुवलुर आणि चेंगलपट्टू इथल्या शाळांना उद्या सुट्टी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसंच समुद्राजवळ राहणाऱ्या लोकांना सुरक्षितस्थळी जाण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. अरक्कोणम इथली दोन एनडीआरएफ पथकं आणि तिरुनेलवेली इथल्या सहा पथकांना बचावकार्यासाठी पाचारण करण्यात आलं आहे.

<><><><><>

केरळमधल्या कन्नुर जिल्ह्यात ऑरेंज तर इडुकी, मलप्पुरम, कोझीकोड आणि वायनाड जिल्ह्यात हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला आहे. इतर जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. येत्या काही दिवसांत पावासाचा जोर आणखी वाढेल, असंही हवामान विभागाने कळवलं आहे.

**<><><><><>**

नौदलाच्या वैद्यकीय सेवेच्या महासंचालक म्हणून सर्जन व्हाइस ॲडमिरल कविता सहाय यांनी आज पदभार स्वीकारला. ३० डिसेंबर १९८६ पासून त्या लष्कराच्या वैद्यकीय सेवेत आहेत. पुण्यातल्या Armed Forces Medical College मधून त्यांनी शिक्षण घेतलं आहे. दिल्लीतल्या भारतीय आयुर्विज्ञान संस्थेतून त्यांनी पॅथॉलॉजी आणि ऑन्कॉलॉजीमध्ये उच्च शिक्षण घेतलं आहे. २०२४ मध्ये त्यांना सेना पदक आणि २०१८ मध्ये विशिष्ट सेवा पदकानं गौरवण्यात आलंय.

**<><><><><>**

मोठ्या प्रमाणात होणारं वायू प्रदूषण लक्षात घेता दिल्ली सरकारनं सर्व प्रकारच्या फटाक्यांच्या उत्पादन, साठवणूक आणि विक्रीवर बंदी घातली आहे. ही बंदी आजपासून १ जानेवारी २०२५ पर्यंत लागू असेल. दिल्ली प्रदूषण नियंत्रण समितीने हा आदेश जारी केला असून फटाक्यांच्या ऑनलाईन विक्रीवरही बंदी घालण्यात आली आहे. हिवाळ्यात संभाव्य प्रदूषण लक्षात घेऊन ही बंदी घातल्याचं दिल्लीचे पर्यावरण मंत्री गोपाल राय यांनी सांगितलं. दिल्लीकरांनी सरकारला सहकार्य करावं असं आवाहन त्यांनी केलं आहे.

**<><><><><>**

अनेक गंभीर गुन्ह्यांत सहभागी असलेल्या नक्षल दाम्पत्यानं आज केंद्रीय राखीव दल आणि गडचिरोली जिल्हा पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. वरुण राजा मुचाकी उर्फ उंगा उर्फ मनिराम उर्फ रेंगू याच्यावर १५ गुन्हे दाखल असून सरकारनं त्याच्यासाठी ८ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. तो छत्तीसगडचा असून तो सध्या भामरागड दलमचा कमांडर म्हणून कार्यरत होता. त्याची पत्नी रोशनी विजया वाच्छामी हिच्यावरही २३ गुन्हे दाखल असून सरकारनं तिच्यावर २ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होतं.